# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 02-07-2024**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये कळमेश्वर ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2024-07-02 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2024-07-03 | 2024-07-04 | 2024-07-05 | 2024-07-06 | 2024-07-07 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 16.9 | 14.9 | 16.1 | 14.5 | 17.2 |
| कमाल तापमान (अं.से) | 34.7 | 33.4 | 33.4 | 33.6 | 34.6 |
| किमान तापमान (अं.से) | 25.2 | 25.3 | 25.5 | 25.6 | 25.7 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 77 | 72 | 75 | 74 | 71 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 52 | 51 | 53 | 54 | 46 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 16 | 17 | 18 | 17 | 14 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 254 | 266 | 257 | 246 | 252 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 8 | 8 | 7 | 6 | 7 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक०३ ते ०७ जुलै २०२४ दरम्यान आकाश आंशिक ते मुख्यतः ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक ०३, ०४, ०५, ०६ व ०७ जुलै २०२४ रोजी खूप हलक्या ते हलक्या/मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता, • दिनांक ०४ व ०७ जुलै २०२४ रोजी वादळी वाऱ्यासह (३०-४० किमी/तास) मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • पुढील ५ दिवसांत विदर्भामध्ये कमाल व किमान तापमानात फारसा बदल होणार नाही. • विस्तारित स्वरूपाच्या अंदाज प्रणालीनुसार विदर्भामध्ये दिनांक ०७ जुलै ते १३ जुलै २०२४ दरम्यान सरासरी पेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता तर कमाल व किमान तापमान सरासरी एवढे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

• पेरणीयोग्य उपलब्ध ओलाव्याची खात्री करून सोयाबीन ची पेरणी ०७ जुलै पर्यंत, खरीप तीळ ०७ जुलै पर्यंत, खरीप ज्वारी ची पेरणी १० जुलै पर्यंतआणि मका ची पेरणी ०७ जुलै पर्यंतवाफसा अवस्थेत करावी. • शेतकरी बांधवांनी सोयाबीन लागवडीसाठी रुंद वरंबा सरी किंवा सरी वरंबा तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. या पद्धतीमध्ये शेतात पाणी साचून राहणार नाही तसेच पावसाच्या खंड असलेल्या काळात पिक व्यवस्थापन करण्यात मदत होईल. • ज्या ठिकाणी कपाशी, सोयाबीन तूर अशा इत्यादी पिकाची पेरणी झाली आहे अशा ठिकाणी वाफसा आल्यानंतर ज्या ठिकाणी खांडे पडले असतील त्या ठिकाणी बियाणे पेरून खांडे भरून घ्यावेत. • शेतकरी बांधवांनी पेरणीपूर्वी बियाण्यास शिफारशीतील असलेली बीजप्रक्रिया करावी. • वादळी वारा व मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतरपाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव वट्रॅक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. जनावरांना गोठ्यामध्ये पुरेश्या चारा व पाण्याची व्यवस्था करावी. • शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजीघ्यावी. झाडाखाली आश्रय घेणे कटाक्षाने टाळावे तसेच पशुधनाचा सुद्धा झाडाखाली आश्रय टाळावा.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

| • शेतकरी बांधवांनी पेरणीपूर्वी बियाण्यास शिफारशीतील असलली बीजप्रक्रिया करावी. |
|---|

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कपाशी | • ज्या ठिकाणी कपाशी पेरणी झाली आहे अशा ठिकाणी वाफसा आल्यानंतर ज्या ठिकाणी खांडे पडले असतील त्या ठिकाणी बियाणे पेरून खांडे भरून घ्यावेत. |
| मुग | • मुग पिकाची सलग पीक म्हणून पेरणी टाळावी. |
| उडीद | • उडीद पिकाची सलग पीक म्हणून पेरणी टाळावी. |
| भात | • हमखास पाऊसाच्या क्षेत्रामध्ये किंवा सिंचनाची सोय असल्यास पेरीव पद्धतीने भाताची लागवड ही जुनचा दूसरा आठवडा ते जुलैच्या १० तारखेपर्यंत करावी. • पावसाची हमी असलेल्या भागात किंवा सिंचनाची सोय असल्यास, भाताची पेरणी जूनच्या दुसऱ्या आठवड्यापासून ते जुलैच्या १० तारखेपर्यंत पेरीव धान पद्धतीने भाताची लागवड पद्धतीने करावी. • दोनदा नांगरटी करून व त्यानंतर डिस्कहॅरो किंवा रोटाव्हेटरणे जमिनीची योग्य मशागत करून भुसभुशीत करावी. • कमी ते माध्यम कालावधीच्या भात वाणाची निवड करावी. • पेरणी करतानी भाताचे/धानाचे बि जमिनीत ५ से. मी. पेक्षा खोल जाणार नाही याची काळजी घ्यावी. • भात/धान पेरणीसाठी नागर, तिफण, मार्कर, ट्रॅक्टर, ट्रॅक्टर चलीत पेरणी यंत्र, ड्रम सीडर ईत्यादीचा वापर करता येऊ शकतो. • तण व्यवस्थापनाकरिता तण नियंत्रणासाठी पेंडीमेथॅलीन ३०% ई. सी. (उगवणपूर्व) @ ५० मि.ली. किंवा प्रेटिलाक्लोर ५०% ई. सी. (उगवणपूर्व) @ २० ते ३० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पेरणीनंतर ओलावा असल्यास लगेच फवारणी व ३० दिवसांनी निंदण करावे. • उगवणपश्चात:- बिस्पायरीबॅक सोडियम २0% + पायरोझोसल्फुरॉन इथाइल १५% WGD ३५% @ ०२ gm १० लिटर पाण्यात पेरणीनंतर १० ते १२ दिवसांनी किंवा मेटसलफ्यूरॉन मिथील १०% + क्लोरिम्युरोन इथाइल १०% WP २०% @ ०.७ ग्रॅम पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी १० लिटर पाण्यात फवारणी करावी. • शेतात पाण्याची मुबलक सोय असल्यास हिरवळीच्या खतांची पिके घ्यावित जेणेकरुन पिक जमिनीत गाडल्यानंतर कुजून नत्राचे स्थिरीकरण होइल व जमिनीत सेंद्रिय पदर्थांची उपलब्धता वाढेल. • शेतात लगवड करण्यायोग्य हिरवळीची खते :- हिरवळीची खते शेतात सलग किंवा फळ पिकांमध्ये आंतरपीक म्हणून पेरतात व त्याच शेतात हे पीक फुलो-यावर येण्यापूर्वी शेतात नागंरून मिसळतात. या प्रकारच्या हिरवळीच्या खतांमध्ये ताग, गवार, चवळी, धैंचा, मूग, मटकी, उडीद, ई. पिकांचा समावेश असतो. • घरचे बियाणे वापरायचे असल्यास त्याची उगवण शक्ती घरीच तपासून घ्यावी व ७० ते ८०% च्या वर उगवणशक्ती असल्यास ते बियाणे पेरणीसाठी वापरावे तसेच त्या अनुषंगाने बियाण्याचे प्रमाण ठेवावे. • पूर्व विदर्भासाठी शिफारस केलेल्या भात वाणांचाच लागवडीसाठी वापर करावा. • पेरणीपूर्वी धान बियाण्यास बीज प्रक्रिया करावी. बीज प्रक्रियेसाठी १० लीटर पाण्यात ३०० ग्रॅम मीठ (३%) या प्रमाणात द्रावण करून त्यात बी ओतावे. द्रावण स्थिर झाल्यावर तरंगणारे हलके रोगयुक्त बी चाळणीने काढून जाळून टाकावे. तळातील निरोगी बी २-३ वेळा स्वच्छ पाण्याने धुऊन सावलीत २४ तास वाळवावे. पेरणीपूर्वी बियाण्यास बुरशीनाशकाची बीज प्रक्रिया करावी तसेच ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक ४ ते ५ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास चोळून बीज प्रक्रिया करावी. |
| सोयाबीन | • ज्या ठिकाणी सोयाबीन पेरणी झाली आहे अशा ठिकाणी वाफसा आल्यानंतर ज्या ठिकाणी खांडे पडले असतील त्या ठिकाणी बियाणे पेरून खांडे भरून घ्यावेत. • पेरणीयोग्य उपलब्ध ओलाव्याची खात्री करून सोयाबीन ची पेरणी ०७ जुलै पर्यंतवाफसा अवस्थेत करावी. • सोयाबीन पिकास शिफारशीत केलेल्या प्रमाणात सर्व पोषक तत्वे (२५:६०:४०:२० किलो प्रती हेक्टरी, नत्र, स्फुरद, पालाश व गंधक अनुक्रमे) संतुलित पद्धतीने फक्त पेरणीच्या वेळी द्यावे. • सोयाबीन पिकासाठी वरील शिफारशीतील अन्नद्रव्याची मात्रा हि (१) ५६ किलो युरिया + ३७५ ते ४०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट + ६७ किलो म्युरेट ऑफ पोटाश किंवा (२) डीएपी @ १२५ किलो + ६७ किलो म्युरेट ऑफ पोटाश + २५ किलो बेंटोनेट सल्फर किंवा (३) १२:३२:१६, २०० किलोप्रती हेक्टर + २५ किलो बेंटोनेट सल्फर प्रती हेक्टर या पैकी कोणत्याही एका रासायनिक खताच्या संयोजनाद्वारे पूर्ण करू शकता. • सोयाबीन पिकामध्ये सुरुवातीच्या काळात रोग आणि किडी पासून संरक्षण करण्यासाठी आणि रोपांची योग्य संख्या सुनिश्चित करण्यासाठी, बियाण्यास बुरशीनाशक आणि कीटकनाशकाची बीज प्रक्रिया करावी. • अॅझोक्सीस्ट्रोबिन २.५ % + थायोफेनेट मिथाइल ११.२५ % + थायामेथॉक्सम २५ % एफएस (१० मिली/किलो बियाणे) किंवा पेनफ्लुफेन + ट्रायफ्लॉक्सिस्ट्रोबिन (१ मिली/किलो बियाणे) किंवा थायरम + कार्बोक्झिन (३ ग्रॅम प्रती किलो बियाणे) किंवा किंवा थायरम + मॅन्कोझेब (३ ग्रॅम प्रती किलो बियाणे) या प्रमाणात शिफारस केलेल्या बुरशीनाशकांनी बियाण्याची प्रथम प्रक्रिया करावी. बीज प्रक्रिया केल्यानंतर बियाणे काही काळ सुकवावे आणि नंतर थायमिथोक्झाम ३० एफएस १० मिली प्रती किलो बियाणे किंवा इमिडाक्लोप्रिड ४८ एफएस १.२५ मिली प्रती किलो बियाणे या प्रमाणात रासायनिक किटक नाशकाची बीज प्रक्रिया करावी. |
| तूर | • ज्या ठिकाणी तूर पेरणी झाली आहे अशा ठिकाणी वाफसा आल्यानंतर ज्या ठिकाणी खांडे पडले असतील त्या ठिकाणी बियाणे पेरून खांडे भरून घ्यावेत. • पेरणीयोग्य उपलब्ध ओलाव्याची खात्री करून तूर पेरणी ०७ जुलै पर्यंतवाफसा अवस्थेत करावी. • पेरणीपूर्वी तुरीच्या बियाण्यास कार्बोक्सीन ३७.५ % + थायरम ३७.५ % डीएस या पुर्वमिश्रीत बुरशीनाशकाची ३ ग्राम प्रती किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | करावी. • तूर बियाण्याला बीज प्रक्रियेसाठी रायझोबियम किंवा स्फुरद विरघळविणारे खते (पीएसबी) {२५० ग्राम प्रती १० किलो बियाणे} यांचा वापर करावा. तूर पिकाचे शिफारस केलेले वाण- एकेटी-८८११, पीकेव्ही-तारा, बीएसएमआर-८५३, बीएसएमआर-७३६ आणि आयसीपीएल-८७११९ (आशा). |
| मका | • पेरणीयोग्य उपलब्ध ओलाव्याची खात्री करून मका पेरणी ०७ जुलै पर्यंतवाफसा अवस्थेत करावी. |
| ज्वारी | • पेरणीयोग्य उपलब्ध ओलाव्याची खात्री करून खरीप ज्वारीची पेरणी ०७ जुलै पर्यंतवाफसा अवस्थेत करावी. |
| तीळ | • पेरणीयोग्य उपलब्ध ओलाव्याची खात्री करून खरीप तीळ पेरणी ०७ जुलै पर्यंतवाफसा अवस्थेत करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| मिरची | • मिरची च्या ४ ते ६ आठवड्याच्या वयाच्या रोपांची लागवड वाफसा अवस्थेत करावी. • मिरचीच्या रोपांची लागवड करण्यापूर्वी रोपांचे शेंडे डायमेथोएट ३० ईसी १० मि. ली + पाण्यात मिसळणारे गंधक (८० %) ३ ग्रॅम + मॅन्कोझेब ७५ % डब्ल्यूपी २.५ ग्रॅम एक लिटर पाण्याच्या द्रावणात बुडवून लावावे. |
| संत्रा | • जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असल्याची खात्री आणि वाफसा आल्यानंतर भरून ठेवलेल्या खड्ड्यांमध्ये संत्र वर्गीय फळझाडांच्या कलमांची लागवड करावी. कलमा लावतांना कलमांचा डोळा १५ ते २० सेंमी उंचीवर असावा. कलमा लावण्यापूर्वी मुळांना मेफेनोक्झाम एम झेड-६८ २.५ ग्राम आणि कार्बेन्डाझीम ५० % डब्ल्यूपी १ ग्राम प्रती १ लिटर पाणी या प्रमाण द्रावण तयार करून बुडवून नंतर लावावीत. • झाडांच्या बुंध्याजवळ पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. झाडावरील पानसोट काढून टाकावेत. दोन ओळीमधील मोकळ्या जागेत उडीद, मुग, सोयाबीन, भुईमुग इत्यादी पिकाची आंतरपीक म्हणून लागवड करावी. हिरवळीच्या खताच्या उपलब्धतेसाठी धेंचा किंवा ताग ४० किलो प्रती हेक्टर बियाणे या प्रमाणात पेरणी करावी. • नवीन नवतीवर सिट्रस सिला, मावा आणि नाग अळीचा प्रादुर्भाव सामान्यपणे दिसून येतो. या किडींच्या व्यवस्थापनासाठी डायमिथोएट# ३० ईसी @ २० मिली किंवा थायमेथोक्झाम# २५ डब्ल्यूजी @ ३.० ग्राम किंवा इमिडाक्लोप्रीड# १७.८ एसएल @ ५.० मिली तसेच कोळी किडीच्या व्यवस्थापनासाठी डायफेनथीयुरोन# ५० डब्ल्यूपी @ २० ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून नवतीच्या काळात स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास वरीलपैकी कोणत्याही किटक नाशकाची १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • पाऊसव विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्याव इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रक्टर व इतरधातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. • जनावरे पावसात फार काळ भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. • गोठयातील जमीन कोरडी ठेवावी व स्वच्छता राखावी. • बुरशी लागू नये यासाठी जनवारांचे खाद्य व चारा सुरक्षित साठवावा. • जनावरांच्या गोठयाचा सभोवतालील परिसर स्वच्छ व निरोगी ठेवावा आणि गोठ्याभोवती असलेली अनावश्यक झाडे झुडुपे काढून टाकावीत. • नवीन हिरवा चारा जास्त प्रमाणात खाण्यास जनावरांना प्रतिबंध करावा. |
| बकरा किंवा बकरी | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |

## कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| पक्षी | • पक्षांना सकस आहार तसेच स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • तननाशकाची खरेदी आणि फवारणी करताना लेबल नीट वाचून घ्यावे. ढगाळ हवामान व पाऊस असताना तननाशकाची फवारणी करू नये. वारा नसताना व जमिनीत पुरेसा ओलावा असताना उगवण पूर्व तन नाशकाची फवारणी करावी. फवारणीकरिता स्वच्छ पाणी वापरावे तसेच कडक उन्हात उगवण पश्चात फवारणी टाळावी. तन नाशकाचा वापर काळजीपूर्वक करावा. फवारणी पूर्वी फवारणी पंप स्वच्छ धुवून घ्यावा. ढगाळ हवामान असतांना फवारणी करू नये. शिफारशीत नसलेली भिन्न तननाशके एक मेकांत मिसळू नये. तननाशकाची फवारणी पूर्वी जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असल्याची खात्री करावी. |